पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १२

**सभावृत्तांत**

दिनांक - **२५/०२/२०१६** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२५/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.पाडाळे निता विलास
६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
९. मा.कुटे चारुशीला प्रभाकर

या शिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे, मा.कडूसकर - सहा.आयुक्त, मा.काटकर - प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामाकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.**

विषय क्र.४) चिंचवड वाल्हेकरवाडी स.नं.४७/४/५/६ येथील नाला बांधणे - मा.भाऊसाहेब भोईर, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.१४ भक्ती शक्ती उद्यान वाहतुकनगरी मध्ये स्वागत कमान करणे - मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.१६ मध्ये गटर्स, पेव्हींगब्लॉक, स्ट्रॉम वॉटर लाईन इ.स्थापत्य विषयक कामे करणे - मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.१६ मध्ये स्थापत्य विषयक कामे करणे - मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०५/०२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ११ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ४९ विषय क्रमांक : १
दिनांक : २५/०२/२०१६ विभाग - आकाशचिन्ह परवाना
सुचक : मा.सुरेश म्हेत्रे अनुमोदक : मा.गोरक्ष लोखंडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५५/२०१६, दि.०९/०२/२०१६

विषय - सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह परवाना फी चे दर निश्चितीबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५० विषय क्रमांक : २
दिनांक : २५/०२/२०१६ विभाग - आकाशचिन्ह परवाना
सुचक : मा.आर.एस.कुमार अनुमोदक : मा.निलेश पांढरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

विषय - सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता उद्योगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी चे दरवाढीस मान्यता मिळणेबाबत ...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५१ विषय क्रमांक : ३
दिनांक : २५/०२/२०१६ विभाग - प्रशासन
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/०७/कावि/६१/२०१६, दि.१२/०२/२०१६

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१६ व आकृतीबंध ...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ५२ विषय क्रमांक : ४

दिनांक : २५/०२/२०१६

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.निलेश पांढरकर

संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

चिंचवड वाल्हेकरवाडी स.नं.४७/४/५/६ येथील नाला कच्चा असल्याने आणि नाल्यात गाळ साचल्यामुळे त्या ठिकाणी दलदल तयार झाली असून आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण झाली आहे. सदरचा चिंचवड स.नं.४७/४/५/६ मधील नाला बांधणे अत्यंत आवश्यक असल्याने याचे काम सदर प्रभागातील प्रभाग क्र.१९ रावेत भोंडवे कॉर्नर येथील डी.वाय.पाटील कॉलेज ते बी.आर.टी.एस.रस्त्यांपर्यंतचा रस्ता विकसीत करणे व सी.डी.वर्क्स बांधणे या चालू असलेल्या कामामधून तातडीने करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५३ विषय क्रमांक : ५

दिनांक : २५/०२/२०१६

सुचक : मा.भारती फरांदे अनुमोदक : मा.निता पाडाळे

संदर्भ : मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१४ भक्ती-शक्ती उद्यान वाहतुकनगरीमध्ये स्वागत कमान करणे कामाचा मनपाच्या चालू सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात पान क्र./अनु.क्र.१०४/९५ वर समावेश आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१०,००,०००/- एवढी आहे. परंतु प्रत्यक्षात स्थळपाहणी करुन अंदाजपत्रक तयार केले असता सदर २४.०० मी. रस्त्यावरील स्वागत कमानीची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५०,००,०००/- एवढी होत आहे. सदर कामाची तातडीने निविदा काढण्याचे गरजेचे असल्याने सदर कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) एवढया रकमेस मान्यता मिळावी. जेणेकरुन कामाची निविदा चालू आर्थिक वर्षात काढणे सोईचे होईल. तरी या कामासाठी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५४ विषय क्रमांक : ६

दिनांक : २५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१६ मध्ये गटर्स, पेव्हींगब्लॉक, स्ट्रॉम वॉटर लाईन इ.स्थापत्य विषयक कामे करणे नि.क्र.५/५४-२०१५-१६ नि.र.रु.१४,४९,५७६/- हे काम आकुर्डी गावठाण येथे दाट लोकवस्तीच्या भागात ठेकेदार मे.श्री कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत चालू आहे. सदरचे काम सद्यस्थितीत ८०% पुर्ण झालेले आहे. सदर कामाची मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.१५,५२,५००/- ही अत्यंत कमी आहे.

नागरिकांच्या सोईसाठी व नविन निविदा काढून होणारा कालपव्यय टाळण्यासाठी सदर कामाची मुळ प्रशासकीय रक्कमेत र.रु.३२,००,०००/- एवढी वाढ करुन सदर कामासाठी एकूण र.रु.४७,५२,५००/- (अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख बावन्न हजार पाचशे फक्त) चे खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५५ विषय क्रमांक : ७

दिनांक : २५/०२/२०१६

सुचक : मा.निलेश पांढरकर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.निलेश पांढरकर, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१६ मध्ये स्थापत्य विषयक कामे करणे नि.क्र.५/२९-२०१५-१६ नि.र.रु.१५,१९,६०७/- हे काम आकुर्डी गावठाण येथे दाट लोकवस्तीच्या भागात ठेकेदार मे.श्री कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत चालू आहे. सदरचे काम सद्यस्थितीत ८०% पुर्ण झालेले आहे. सदर कामाची मुळ प्रशासकीय मान्यता र.रु.१६,२७,५००/- ही अत्यंत कमी आहे. नागरिकांच्या सोईसाठी व नविन निविदा काढून होणारा कालपव्यय टाळण्यासाठी सदर कामाची मुळ प्रशासकीय रक्कमेत र.रु.३२,००,०००/- एवढी वाढ करुन सदर कामासाठी एकूण र.रु.४८,२७,५००/- (अक्षरी र.रु.अठ्ठेचाळीस लाख सत्तावीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **नंदा विकास ताकवणे** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ १२९ /२०१६
दिनांक : २५/०२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.